आकाशवाणी नागपूर,

(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार, दिनांक १८ जून २०२४

ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शेतकरी सन्माननिधीचा पुढचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा, राज्यातल्या ९० लाखांहूनअधिक शेतकऱ्यांना लाभ.
2. यंदाचा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम श्रीनगरमध्ये - आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती.
3. खरीप-2024 साठी पीक विमा भरण्यास सुरुवात, एक रुपयात भरला जाणार पीकविमा - कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची माहिती
4. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपूरच्या नागनदी स्वच्छता प्रकल्पाच्या कामाला गती देण्याचे निर्देश.

आणि

5. टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत 'सुपर आठ' संघ निश्चित, २० जून रोजी होणार भारत - अफगाणिस्तान लढत.

*****

शेतकरी सन्मान निधी

'केंद्रात आपले सरकार बनल्यावर सर्वात प्रथम शेतकरी आणि गरीबांना प्राथमिकता देणारे निर्णय घेण्यात आले. महिला, गरीब, शेतकरी आणि युवा हे कायम नवभारताचे प्रमुख स्तंभ असतील असं पंतप्रधान मोदी म्हणाले.' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज शेतकरी सन्मान निधीअंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा १७ वा हप्ता जारी केला. नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम थेट जमा करण्यात आली. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. ही योजना जगातील सर्वात मोठी थेट लाभ हस्तांतरण योजना असल्याचं ते म्हणाले. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना, तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला

आहे. उत्तर प्रदेशातल्या वाराणसी इथं झालेल्या याच कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते, स्वयं सहाय्यता गटातल्या ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटप करण्यात आलं. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान केल्याचा उल्लेख करून त्यांनी महिलांचं कौतुक केलं. लोकशाहीच्या उत्सवात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतल्याबद्दल त्यांनी आभार मानले. आपल्या सरकारला तिसऱ्यांदा निवडून देणे हा लोकांचा आपल्यावरील विश्वास दर्शवतो असे ते म्हणाले. दरम्यान, देशभरात निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात, केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

विधानपरिषद निवडणूक

विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठीच्या निवडणुकांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. विधानसभेच्या आमदारांमधून या सदस्यांची निवड होणार आहे. या निवडणुकीची अधिसूचना २५ जून रोजी जारी होणार असून २ जुलैपर्यंत अर्ज भरता येतील. ३ जुलैला अर्जांची छाननी होईल आणि ५ जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. १२ जुलै रोजी ९ ते ४ दरम्यान मतदान होऊन त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

प्रतापराव जाधव योग दिन

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम श्रीनगरमध्ये शेर-ए-कश्मिर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटरमध्ये होणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यात सहभागी होतील, अशी माहिती आयुष खात्याचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. योगासनांवर आधारित प्रोफेसर आयुष्मान योग विशेष या कॉमिक पुस्तकाचं अनावरणही त्यांनी आज केलं. दरम्यान, योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उष्ट्रासनाची माहिती देणारी एक चित्रफित आज सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. या आसनामुळे पाठीचे आणि मानेचे स्नायू मजबूत होतात, त्याचबरोबर रक्ताभिसरण सुधारण्यासोबतच, दृष्टीही सुधारते. या आसनाचा सराव करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

योग दिन

दरम्यान, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातील एम.ए. योगशास्त्र आणि योग थेरपी अभ्यासक्रमाच्या वतीन **10** व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त **21** जून रोजी सकाळी **6:30** वाजता विद्यापीठातील शारीरिक शिक्षण आणि रंजन विभागाच्या मैदानावर योग दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

पीक विमा

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत महाराष्ट्रात खरीप हंगाम - **2024** साठी पीक विमा भरण्याची सुरुवात आजपासून शासनाच्या **www.pmfby.gov.in** या पोर्टलद्वारे करण्यात आली असून, याही वर्षी शेतकऱ्यांना आपल्या अधिसूचित पिकांचा विमा भरण्यासाठी केवळ **1** रुपया भरावा लागणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून मागील वर्षी विक्रमी **1** कोटी **70** लक्ष पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपला पीकविमा भरून या योजनेत सहभाग घेतला होता. खरीप **2024** साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे, कांदा ही **14** पिकं-विमा योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. तर या पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत **15** जुलै असून, त्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरून घ्यावा, असं आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. पीक कर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा योजनेतील सहभाग ऐच्छिक राहील, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पिक विमा पोर्टल वर नोंदणीकृत भाडे करार अपलोड करणे आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालय

नीट-यूजी**2024** परीक्षेतील अनियमिततेच्या तक्रारीवर आज, सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. जर एखाद्याकडून **0.001** टक्के निष्काळजीपणा झाला असेल तर त्यावर पूर्णपणे कारवाई केली गेली पाहिजे असं सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं. न्यायालयाने विद्यार्थ्यांबाबत चिंता व्यक्त करत नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) आणि केंद्र सरकारला नोटीस बाजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता **8** जुलै रोजी होणार आहे.

शरद पवार

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दाखवण्यात आलेल्या एक्झिट पोल दरम्यान, शेअर बाजारात हेराफेरी झाली होती का? याची चौकशी करावी या मागणीसाठी,

तृणमूल काँग्रेसचे खासदार सेबीला भेट देण्यासाठी मुंबईत दाखल झाले आहेत. त्यांच्या या मागणीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पाठींबा दिला असल्याची माहिती ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या एक्स खात्यावरून दिली आहे. या खासदारांनी शरद पवार यांच्या मुंबईतील निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी खासदार कल्याण बॅनर्जी, सागरिका घोष आणि साकेत गोखले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत, खासदार सुप्रिया सुळे माजी आमदार विद्या चव्हाण आदी उपस्थित होते.

लक्ष्मण हाके

'आजच्या कॅबिनेट बैठकीत मंत्र्यांनी ओबीसींबाबत आपण **12** कोटी जनतेचं प्रतिनिधित्व करत आहोत, या भावनेनं वागावं' असा सल्ला ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सरकारला दिला आहे. दरम्यान, जालन्या जिल्ह्यातील वडीगोद्री इथल्या ओबीसी आरक्षण बचाव संयोजन समितीन, सरकारसोबत चर्चेसाठी कोणतेही शिष्टमंडळ जाणार नसल्याचां निर्णय झाल्याचं देखील हाके यांनी सांगितलं.

रवींद्र वायकर

“ईव्हीएम मशीन हॅक झाली असती तर भाजपाला आणखी जागा मिळाल्या असत्या. ४०० पारचा नारा त्यांनी दिलेला होता त्यामुळे त्यांना असं काही करता आलं नसतं का? मोबाईलच्या माध्यमातून ईव्हीएम हॅक होते हे सिद्ध केलं तर देश नाही जगातही कळेल असं काही होतं. आरोप करणाऱ्यांनी खरोखरच सिद्ध करून दाखवावं, असं आव्हान खासदार रवींद्र वायकर यांनी ठाकरे गटाला दिलं आहे. आज खासदार वायकर यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

रक्षा खडसे

केंद्रीय राज्यमंत्री पदाची धुरा सांभाळल्यानंतर रक्षा खडसे ह्या विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव इथल्या संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी काल आल्या होत्या. त्यांच्यासोबत एकनाथ खडसे होते. क्रीडा क्षेत्रात युवकांसाठी भरीव काम करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

तरुणीची हत्या

वसईमध्ये आज भर रस्त्यात तरुणाने मुलीवर वार करत तिची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून आरोपीला वालीव पोलिसांनी अटक केली आहे.'वसईत एका तरुणीची

भररस्त्यात हत्या झाल्याची घटना अत्यंत गंभीर आणि दुर्दैवी आहे. मीरा-भाईंदर पोलिस आयुक्तांना या घटनेसंदर्भात कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आरोपीला अटक करण्यात आली असून, सखोल तपास करुन, न्यायालयात सुद्धा भक्कम पुराव्यानिशी बाजू मांडून आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा होईल, यादृष्टीने निर्देशित करण्यात आल्याचं उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमांवरून सांगितलं आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपुरात नागनदी स्वच्छता प्रकल्पाच्या कामाला गती देण्याचे निर्देश दिले. २ हजार ४३४ कोटी रुपयांचा हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रक्रिया देखील वेगानं पूर्ण करण्याचे निर्देश गडकरी यांनी दिले आहे. रवी भवन इथं गडकरी यांच्या अध्यक्षतेत नागपूर शहरातील विविध विकासकामांसाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आली. नाग नदी स्वच्छता प्रकल्पाच्या कामांची माहिती घेऊन सर्व विभागांनी एकत्र येऊन तांत्रिक अडचणी सोडवाव्या असे निर्देश यावेळी त्यांनी दिले. नागपूर शहर एनएमआरडीए परिसराचा एकत्रित प्रकल्प करून नदीत पुढे अस्वच्छ पाणी जाणार नाही, याचीही काळजी घेण्यात यावी, असं गडकरी म्हणाले. नागनदीचे प्रदूषण रोखण्यासाठी शहरातील सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा अद्ययावत करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. याशिवाय रामजी पहेलवान रस्ता, एलआयसी चौक, जुना भंडारा रोड इथल्या भूसंपादनाची प्रक्रिया वेगाने सुरू करावी तसेच रेल्वे स्टेशन मार्गावरील दुकानदारांची कायमस्वरूपी पर्यायी व्यवस्था करावी, असेही निर्देश गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिले.

टी-ट्वेंटी विश्वचषक -सुपर-८

टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत 'सुपर आठ' संघ निश्चित झाले आहेत. सुपर ८ च्या पहिल्या गटात भारत, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश आणि अफगाणिस्तान तर दुसऱ्या गटात अमेरिका, इंग्लंड, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचा समावेश आहे. सुपर ८ फेरीतला पहिला सामना उद्या अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेत खेळला जाईल. तर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात २० जून रोजी सामना होणार आहे. दोन्ही गटातल्या प्रत्येकी दोन सर्वोत्तम संघांना उपांत्य फेरीत प्रवेश मिळणार आहे. अंतिम सामना 29 जून रोजी बार्बाडोस इथं खेळला जाणार आहे. सुपर आठ मधील भारत,

ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका हे  संघ आतापर्यंत झालेल्या सामन्यांत अपराजित राहिले आहेत.

******